झाली किंवा अतिशय कटकटीच्या जागी झाली, तर त्याला व त्याच्या कुटुंबियांना त्रास होऊ शकतो व तो टाळता येणारा नसल्यानं कुटुंबियांमध्ये त्याच्याविषयी नाराजी निर्माण होते व किंबहुना, अशी बदली त्याला सर्व दृष्टींनी त्रासदायक होते. तेंव्हा, आदर्श आचारासाठी सध्या सामाजिक परिस्थितीच प्रतिकूल आहे. त्यामुळे भ्रष्ट समाज पाहून त्यात साधनेतील पथ्यं कशी पाळावीत, ह्या विषयीच्या विवंचना भक्ताला नेहमी भेडसावतात व तो त्रस्त होतो.

लेखाची मर्यादा सांभाळून मी फक्त हे एक उदाहरण दिले. प्रत्यक्षात वेगवेगळ्या ठिकाणी येणाऱ्या विविध अडचणींना आदर्श भक्ताला सामोरं जावे लागते. तेंव्हा, या संदर्भात भक्ताने कसे वागले पाहिजे, हे पाहू या.

या समस्यांचा विचार करताना आपण सर्वप्रथम आपलं ध्येय काय आहे, हे पाहू या. आपल्याला श्रींची कृपा जर मिळवायची व टिकवायची असेल, तर त्यांनी घालून दिलेल्या पथ्यांचं तंतोतंत आचरण करणं, हे भक्त म्हणून आपलं आद्य कर्तव्य ठरतं; कारण त्यामुळे आपलं अंतिम व कायमचं कल्याण होणार असतं. अर्थातच, या पथ्यपालनात सद्यस्थितीमुळे अडचणी येणारच, हे निःसंशय. परंतु याचा अर्थ ती पथ्यं न पाळणं व तरीही श्रींनी कृपा करावी, ही अपेक्षा ठेवणं रास्त होणार नाही. कारण त्यामुळे भक्ती हे लायसन्स किंवा परमिट ठरेल; शिवाय या कसोटद्या दिल्यानं व त्यातून यशस्वीपणे बाहेर आल्यानंतर आपला श्रींवरचा विश्वास दृढ होईल. त्यासाठी काही वेळा त्रास झाला, तर तो मार्गावर चालण्याचा त्रास असेल; परंतु त्याचा सर्वात मोठा फायदा त्या भक्ताचा असेल; कारण यामुळे त्याचे मोक्षमार्गावरचे कापण्याचे अंतर तेवढ्या प्रमाणात कमी झालेले असेल. याचा थोडक्यात अर्थ असा की, अशाप्रकारे मुलभूत जीवनमूल्यांशी व भक्तिमार्गातील पथ्यांशी फारकत केल्याने आपण फक्त हा प्रवास पुढे करायचे, असं समजून आपल्या जीवनाचं उद्दीष्ट पुढे साध्य करण्याचे ठरवून त्याला फक्त दूर ठेवत आहोत. शिवाय अशा तडजोडीमुळे आपण सत्वगुणाला दूर ठेवून मनुष्यजन्मानंतरच्या अधमयोनी मात्र प्राप्त करून घेण्याची पात्रता या जन्मी मिळवत आहोत, हे लक्षात ठेवलं पाहिजे. कारण ''चिरीमिरी'' किंवा ''चहापाणी'' घेण्याने आपण आपला लोभ वाढवून साईसत्चरितातील ४७व्या अध्यायात वर्णन केलेल्या वीरभद्राच्या व चनबसप्पासारखे सर्प व बेडूक यांच्या जन्मास पात्र होऊ. कलियुगात या गोष्टीचा त्रास होणारच, हे ओळखून श्रींनी वेळोवेळी श्री साईसत्चरितात पूर्वजन्माचा उल्लेख केला आहे व काम, क्रोध, लोभ, मद, मोह व मत्सर यांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव असणाऱ्या या युगात भक्तांने इतर वागतात, तसं वागण्याचे परिणाम अगोदरच दाखवून सावध केले आहे. त्यामुळे थोडासा त्रास झाला, तरी तो शांतपणे सहन करण्याची तयारी त्याने ठेवली, तर प्रत्येक कसोटीला उत्तीर्ण होऊन

भक्त मोक्षाच्या मार्गाचे अंतर या जन्मीच कापून व तशीच तयारी असेल, तर तो या जन्मीच मोक्ष मिळवू शकेल.

आता भ्रष्ट समाजातही त्रस्त न होता वाटचाल करणाऱ्या भक्तासाठी श्री बाबा काय करतात, ते पाहू.

या लीलेतील सद्गृहस्थाचे नाव मला श्री. सहाय यांनी सांगितले नाही. पण श्री. सहाय यांनी ज्यांची ही कथा सांगितली, ते आय्.ए.एस्. गृहस्थ अतिशय सचोटीने वागण्याबद्दल विख्यात. त्यांच्या उपवर मुलीचे लग्न ठरले. सुयोग्य स्थळ आले. परंतु जेवणावळीसाठी लागणारा खर्च देण्याइतकी रक्कम त्यांच्याकडे नव्हती. तेव्हा काय करावे, या विचारात असता एक गृहस्थ आले व म्हणाले की, ''आपल्याकडील लग्नाच्या जेवणाचे कंत्राट मिळेल, असे वाटले म्हणून आलो.''

''परंतु माझ्याजवळ तुम्हाला ॲडव्हान्स देण्यासाठीसुद्धा रक्कम नाही'' आय्.ए.एस्. गृहस्थ.

''हरकत नाही; ते नंतर पाहू'' कंत्राटदार.

लग्न झाल्यानंतर कंत्राटदार जेव्हा भेटला, तेव्हा आय्.ए.एस्. गृहस्थांनी बिल मागितले. कंत्राटदाराने ते उद्या पोष्टाने येईल, असे सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या डाकेने एक पाकिट आले. ते उघडून पाहिल्यावर आय्.ए.एस्. गृहस्थाला श्रींचा आशीर्वादाचा फोटो मिळाला. त्याच रात्री श्री बाबा त्याच्या स्वप्नात गेले व त्याला म्हणाले की, ''तू माझ्यासाठी इतके केलेस; मी तुझ्यासाठी एवढंसुद्धा करू शकत नाही?''

भक्तांनो, भ्रष्ट समाजातही तडजोड न करता जगणाऱ्या भक्तांनी त्रस्त होऊन न जाता साधनेची पथ्यं सांभाळली, तर श्री त्याला संपूर्णपणे सांभाळतात, हे सिद्ध करण्यासाठी आणखी कोणता पुरावा हवा?

यासाठी, ज्यांना श्रींच्या कृपेस पात्र होऊन ती पात्रता टिकवायची असेल, त्यांनी शक्य तितकी पथ्यं त्रास झाला, तरी सांभाळली पाहिजेत. त्यामुळेच त्यांचे अंतिम कल्याण होईल, हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे इतक्या भ्रष्ट समाजातही आपला सांभाळ बाबा करतील, या दृढ विश्वासाने न कचरता वागले पाहिजे.

# 'साई' नाम अक्षरे दोन, गुरुकृपेचा समुद्र जाण

-श्री. वि. म. हटवार
रेशीमबाग, नागपूर.

व्यक्तिगत विकासासाठी माणसाला तीव्र आकांक्षा पाहिजे. देहासक्ती दूर झाल्यावर चित्ताची एकाग्रता, जीवनाची परिमितता व समदृष्टी येते. आत्मज्ञानाने आत्मदर्शन होते. सद्‌गुरुकृपेचा महिमा असा आहे की गुरुकृपेशिवाय संताची किंवा साधकाची नामसाधना श्रेष्ठत्वास कधीही पोहचू शकत नाही, पूर्णत्व येऊ शकत नाही. श्री सद्‌गुरु शंकराचार्यांनी बालपणातच वेदविद्या सम्पन्न केली, तरीही त्यांना गुरुची ओढ लागली, म्हणून ओंकारेश्वर येथे जाऊन गुरुदीक्षा प्राप्त करून घेतली.

संत नामदेव म्हणतात, अंत:करणात साईरामनामाची आस धरली जात नाही, तोपर्यंत जन्मकार्य सफल होत नाही. रामनामाने आत्मज्ञान, मन शांत ठेवल्याने प्राणाने संयमन व विकार शांत झाल्याने नम्रतायुक्त विवेक जागृत होतो. मुळात सर्व गुण जन्मत:च मनुष्यात असतात. गुणांचा विकास झाला, तर जीवन यशस्वी होते. अवगुणांची सोबत जीवन बिघडविते. याच देही मनुष्य पशूसमान होऊ शकतो. अहंकाराने अधोगतीस जातो.

सद्‌गुरुवर श्रद्धा ठेवून त्यांना मनाने गुरु मानावे. त्यांच्या चरित्रग्रंथाचे वाचन करावे. खऱ्या संतांचे बोलणे, वागणे इतके विचित्र असते की, त्यांच्या बोलण्याचा अर्थ साधारण व्यवहारी माणसाला कळत नाही. कित्येकांना त्यांचे खरं स्वरूप कळलेले नसते. संत-सद्‌गुरुचे स्वरूप ज्यास कळले, अशा शिष्यास वैराग्य येऊन आध्यात्मिक प्रगतीने त्याचे भविष्य सुधारते. उपासनी महाराजांना श्री साईने अध्यात्माच्या व सिद्धीच्या शिखरावर पोहचविले.

श्री गुरु जन्म सफल होण्याचे ज्ञान देऊन, मरण चांगले करून, देवाची व शिष्याची गाठ घालून देतो. सद्‌गुरुवाचून खऱ्या मार्गाचा पत्ता लागू शकत नाही. माता-पिता-गुरु यांची खरी ओळख ज्याला झाली, त्याला खरा आनंद मिळतो. सुख व आनंद यांत फरक आहे. प्रपंचात सुख मिळते आणि परमार्थात आनंद मिळतो. संत, सद्‌गुरु, वडील, आई व थोर, वडिलधारे यांची कोणत्याही प्रकारे अखंड सेवा करणे, हा गुरुविषयी प्रेमभाव वाढविण्याचा सोपा मार्ग आहे. श्री गुरु गोरखनाथांनी सांगितले की, ज्यास गुरु भेटला, तो ब्रह्मरस पिऊन तृप्त होतो व जो विनागुरुचा साधक असेल, तो अतृप्त असतो.

सद्गुरुच्या उपदेशाने भक्तांच्या व साधकांच्या मनांतील सर्व अज्ञान व भ्रम नष्ट होतात, जन्मोजन्मीची जीवाच्या ठायी असलेली मनोकामना पूर्ण होते. जीवांचे कर्मदोष सद्गुरु आपल्या चरणी घेतो व त्यांना मुक्ती देतो.

शिर्डीश्वर साईनाथ एका ठिकाणी राहून आपल्या नित्यक्रमास चालवित आणि तरीही भक्तांच्या मनांत किंवा घरांत काय चालले आहे, हे चलत-चित्रासारखे सांगत असत. अडचणींच्यावेळी भक्तांना सहाय्य करीत, चमत्कारी जीवनाचा अनुभव सांगून प्रेम व्यक्त करीत. बाबांच्या लीलांचे भक्तगण कौतुकाने वर्णन करतात. श्री रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, जनार्दनस्वामी, समर्थ रामदास, स्वामी रामतीर्थ, निवृत्तीनाथ यांच्यासारखेच सद्गुरु साईनाथाचे स्थान उच्च आहे. श्री साईबाबांनी माणसांतून देव साकार केला. पतिताला पदस्पर्शाने, प्रसादाने आणि उदीने पावन करणारे साईनाथ आजही भक्तांची शिर्डीत प्रतिक्षा करीत आहेत.

गुरुचरित्रात सांगितले आहे की, ईश्वराचा कोप झाला, तर गुरु वाचवू शकतो; पण गुरुचा कोप झाला असेल, तर ईश्वरही वाचवू शकणार नाही. सद्गुरु एका जन्मात मिळत नाही, अनंत जन्मांच्या पुण्याईने श्री सद्गुरुची भेट होत असते.

श्री साईने भक्तांना सांगितले आहे की, संसार अलिप्त भावनेने, म्हणजे त्यात न रमता करावा; कारण रमलेल्या माणसाला शेवटी अपेक्षाभंगाचे दु:ख वाट्यास येते. संसारात ज्यांना आपण माझे म्हणतो, ते आपले नसतेच; कारण त्यापैकी काहीही आपल्याला परलोकात नेता येत नाही. ज्यांना आपण जवळचे समजतो, असे काही लोकही दु:खाच्या प्रसंगी पाठमोरे होतात. माणूस एकटाच जन्माला येतो आणि मृत्यूच्या वेळी एकट्यानेच जगाचा निरोप घेतो. माणसाच्या हातून होणारे जे बरेवाईट कर्म, तेच साथीला असते. माणसाला हे कळते; पण वळत नाही. संसारातील मायेचे यथार्थ स्वरूप जाणून घेऊन साईभक्तीकडे वळणारे आनंद देणारा हा मार्ग सोडत नाहीत. वैराग्यपूर्ण जीवनांत खरे सुख त्यांना साईकृपेने लाभते. ते सर्वांशी समभावाने वागतात. 'आत्मवत् सर्वभूतेषु' हा अनुभव जगातील सर्व साईभक्तांनी घ्यावा, हे श्री शंकराचार्यांनी शिर्डी संमेलनात सांगितले आहे. नेहमी सावधानतेने वागावे व सदैव सुसंस्कार होतील, याची दक्षता घ्यावी आणि गुरूचरणी इमानदारीने एकनिष्ठ रहावे, असा देवावर श्रद्धा ठेवून भवसागर तरुन जाण्याचा उपदेश शंकराचार्यांनी केला. कृपेचा सागर साई आहे.

शिर्डीक्षेत्री साईभक्तीने भारलेले असंख्य लोक श्रींचे पूजन करताना दिसतात. त्यांच्या श्रद्धायुक्त अंत:करणातील भक्तिभावाला साईमूर्ती प्रत्यक्ष देवच असते. हे सद्गुरू साईनाथ भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारे आहेत, फक्त श्रद्धा व सबुरी हवी.

---

# ''श्री साईलीला'' लेखक-कवींना निवेदन

## गद्य लेखन

''श्री साईलीला''कडे साहित्य पाठविताना ''श्री साईलीला'' लेखकांनी पुढील प्रकारात आपले लिखाण बसते का, याची दक्षता घ्यावी.

(१) सर्वसाधारण

* दिवंगत थोर संत महात्म्यांवर आधारित समयोचित लिखाण. त्यांच्या जीवन-उपदेशाचे बाबांच्या जीवन-उपदेशाशी समांतरत्व विशेषत्वाने प्रगट असावे.

* श्री साईबाबांचे पूर्व व समकालीन संतांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली व श्री साईबाबांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली यांतील साम्य व भेद.

(२) अनुभव

* श्री साईबाबांचे उपदेश आचरण करताना आलेले अनुभव. लेखकांनी आपले विचार मोकळेपणाने व कलापूर्णरीत्या मांडावे.

* श्री साईबाबांच्या कृपाछायेचे अनुभव. हे अनुभव सांसारिक अडी-अडचणींचे असावेत, तसेच साधना करताना आलेले अनुभवही असावेत.

(३) शिकवण

* श्री साईबाबांचे उपदेश, बोल व घटना यांविषयी आपल्याला झालेले आकलन, उमगलेला विश्लेषणात्मक अर्थ.

(४) भाषांतर

* श्री साईबाबांच्या जीवनावरील अन्य भाषेतील समर्पक लिखाणाचे अनुवाद. (मूळ लेखकाचा, पुस्तकाचा संदर्भ देणे आवश्यक)

(५) महिला व बालसाईभक्त

* बालसाईभक्तांसाठी हलक्या-फुलक्या, सहज-सोप्या भाषेत आध्यात्मिक लिखाण. महिलांसाठी खास साईभक्तीपर लेखन.

(६) धर्म-अध्यात्म

* विचार प्रवर्तक आध्यात्मिक लिखाणास प्राधान्य मिळेल. योग, भक्ती, ज्ञान व इतर साधनांबाबत वाचकांना प्रबोधन होईल, अशा लिखाणाचा विशेष विचार केला जाईल.

## कवितालेखन

* कवींनी आपले दर्जेदार काव्यच ''श्री साईलीला''त प्रसिद्ध करण्यासाठी पाठवावे. वृत्त, ताल, छंद वा मुक्त छंद इत्यादी आकृतीबंधात न बसणाऱ्या कविता स्वीकारणे शक्य होणार नाही. यासाठी कवितांची रचना व आशय याकडे अधिक लक्ष पुरवावे. कविता

बाबांच्या चरित्र-लीलांवर किंवा परमेश्वरावरील स्वतःच्या भक्तिभावनेचे आविष्करण करणाऱ्या असाव्यात.

* ''श्री साईलीला''करिता साहित्य लिहिताना कागदाच्या दोन्ही बाजूस पुरेसा समास सोडावा. दोन ओळींच्यामध्ये पुरेसे अंतर ठेवावे. कागद जीर्ण-विजीर्ण असू नये. आशय व्यक्त करताना तो मुद्देसूद व सलगपणे मांडावा.

अस्वीकृत लिखाण

* ''श्री साईलीला'' लेखक-कवींनी आपल्या काव्य व लेखाची एक प्रत स्वतःच्या रेकॉर्डसाठी स्वतःकडे ठेवणे आवश्यक आहे. प्रसिद्ध न झालेले साहित्य परत पाठविणे अशक्य आहे. तरी, त्यासंबंधीची विनंती कृपया करू नये.

* लेखक-कवींनी देण्यात येणाऱ्या सूचनांचा बारकाईने अभ्यास करावा. या सूचनांनुसार निवडलेले लेख, कविता, अनुभव यांचाच प्रसिद्धी करिता विचार केला जाईल.

## ''श्री साईलीला'' सभासदांना निवेदन

*** ''श्री साईलीला'' संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना ''श्री साईलीला''च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या ''श्री साईलीला'' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.**

* ''श्री साईलीला'' वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

* पत्त्यात बदल झाल्यास शिरडी कार्यालयाला त्वरित कळवावे. पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

* आपल्या पत्त्यात काही दुरूस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्याविषयी त्वरित शिरडी कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.

* ''श्री साईलीला'' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या शिरडी व मुंबई कार्यालयाकडे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो ''श्री साईबाबा संस्थान शिरडी'' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. ''संदेश के लिए स्थान'' आणि ''भजनेवाले का नाम व पूरा पता'' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* मनिऑर्डर-पत्रावर नाव-पत्ता लिहिताना तो वाचता येईल, अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ९-०० |
| २. | –"– | इंग्रजी | १२-५० | ६-५० |
| ३. | –"– | हिंदी | १६-७५ | – |
| ४. | –"– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –"– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –"– | तेलगु | १९-०० | ८-०० |
| ७. | –"– | तामीळ | – | – |
| ८. | –"– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साईसत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | ९-०० | – |
| ११. | –"– | हिंदी | ११-०० | – |
| १२. | –"– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ४-२५ | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –"– | हिंदी | १-१५ | ३-५० |
| १६. | –"– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –"– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –"– | गुजराथी | ०-९५ | ३-५० |
| २०. | –"– | तेलगु | ३-५० | ५-५० |
| २१. | –"– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | – |
| २५. | –"– | इंग्रजी | १-८५ | – |
| २६. | –"– | हिंदी | १-५० | – |
| २७. | –"– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –"– | तेलगु | २-०० | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १-१५ | ३-५० |
| ३०. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६-०० | ४-०० |
| ३१. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४-५० | ४-०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-५० | ४-०० |
| ३३. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |
| ३४. | स्तवनमंजरी | इंग्रजी | १-१० | ३-५० |
| ३५. | शिरडी डायरी (खापर्डे) | इंग्रजी | ९-५० | ४-५० |

मे १९९०) (किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक





# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक
श्री साईबाबांच्या
दिव्य संदेशाचा प्रसार


र्ष ६१ वे) मे १९९० (अंक २ रा

भारतीय वैशाख शक १९१२



संपादक

के. पं. क्षीरसागर

कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

★ कार्यकारी संपादक ★

डॉ. वि. वा. सातपूरकर

शास्त्री, एम्.ए., पीएच्. डी., पंचांगकर्ता

–: कार्यालय :–

पोस्ट–शिरडी–४२३१०९, जिल्हा–अहमदनगर.

साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनि–४१२ २५ ६१



–वर्गणी–

वार्षिक– रु. १० परदेशीय रु. ११५ तहहयात– रु. ३००

(टपाल खर्चासहित)

किरकोळ अंक– रु. २


---


या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही



वर्ष ६९ मे १९९० अंक १
वैशाख शालिवाहन शक १९१२
शिवशक ३१६, विक्रमसंवत् २०४६
हिजरी १४१० फसली १३५९

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | रघुनाथ-सावित्री साईनाथ भजनमाला | – | ३ |
| २. | संपादकीय | – | ४ |
| ३. | जाहीर निमंत्रण | – | ६ |
| ४. | श्री साईबाबा भक्तांना नम्र आवाहन | – | ७ |
| ५. | संतस्वरूपाची ओळख सर्वांनाच का होत नाही? | – वैद्य भाऊसाहेब कुलकर्णी | ९ |
| ६. | परमेश्वर, संत आणि भक्त | – सौ. प्रविणा कांबळी | १७ |
| ७. | साधुसंत आणि चमत्कार | – डॉ. दा. बा. भिंगारकर | १९ |
| ८. | मंत्रसिद्धी | – श्री. आर. पी. राव | २१ |
| ९. | वसंत ऋतुतील आहार-विहार | – वैद्य किरण भावे | २२ |
| १०. | ॐ नमो भगवते साईनाथाय | – कु. सरस्वती बुलबुले | २४ |
| ११. | श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ६ वा | – श्री. मु. ब. निंबाळकर | २५ |
| १२. | माझा देव भोळा फकीर | – श्री. सुरेंद्र देसाई | ३३ |
| १३. | जे जे आपणांसी ठावे। | – श्री. अ. के. चैतन्य | ३४ |
| १४. | प्राणीमात्रांवरही बाबांची सत्ता | – श्री. रमेश चव्हाण | ३६ |
| १५. | भक्ती-महात्म्य | – श्री. म. वि. सामंत | ३८ |
| १६. | हिंदु-धर्मात अंकांचे महत्त्व | – श्री. सतीश चुरी | ४१ |
| १७. | श्री साईबाबांची–शिक्षण पद्धती | – सौ. वैदेहि दिक्षित | ४४ |
| १८. | जाणा येथे आहे | – श्री. दिलीप सावंत | ४६ |
| १९. | साम्यावस्था | – श्री. शाम जुवळे | ४७ |
| २०. | पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा | – सौ. शोभा देशपांडे | ४८ |
| २१. | भक्ति म्हणजे काय? | – एक साईभक्त | ५० |
| २२. | श्री साई शिरडीस येऊन जीवन्मुक्त झाले | – श्री. वि. म. हटवार | ५२ |
| २३. | श्री साई शरणावली | – सौ. गौरी नाईक | ५४ |
| २४. | साई-श्रद्धा | – श्री. भालचंद्र गन्द्रे | ५५ |
| २५. | तुम्ही बाबांना काय द्याल | – वैखरीताई | ५६ |
| २६. | दिव्य जीवनाकडे | – चकोर आजगांवकर | ५९ |
| २७. | श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र | – | ६२ |
| २८. | महिना विशेष | – | ६४ |



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

१०७

इतनि बिनति मेरी मान। सांई इतनी बिनति मेरी मान॥ध्रु.॥
तृषित है बहू दासि तुम्हारी। दिजो भक्तिरसपान॥सांई.॥
भवसागरमें रमते रमते। निकल गया सब भान॥सांई.॥
कहांसे आई कहां जाउंगी। ये नहिं कछु मुझे ग्यान॥सांई.॥
हात जुराके चरणकमलपर। शीस रखूं करु ध्यान॥सांई.॥

१०८

दिसताती भक्त संसारी विरक्त। परि ते आसक्त जनसेवे॥
जनसेवा काम करिती निष्काम। पावती विराम तुझे नामीं॥
नामाचा महिमा जाणे संत नामा। आणि तुकारामा ठावू झाला॥
ठाव त्या मिळाला विठू नगरीला। वैकुंठासी नेला माउलीनें॥

१०९

जडों तुझे पायीं सदा माझें चित्त। हेंचि धनगोत देई मज॥
इतर सुखें हीं मिश्रित दुःखांहीं। मूढमती मोहीं गुंतलों मीं॥
साराचें तें सार नामाचा उच्चार। हाचि उपचार करीं वेगीं॥
नको मज कांही दुसरें आणीक। दासाचा पालक सांई माझा॥

११०

भावशुद्ध सेवा करूं कैसी देवा। नाकळे तें जीवा अजूनियां॥
गुळाचें माधुर्य कानीं ऐकियलें। परि ना चाखिलें बाबा सांई॥
बीजआरोपण ओलाव्यावांचून। व्यर्थची तो शीण होईल जैसा॥
याचितसे दास मार्ग तो बरवा। त्वरित कीं दावा परमार्थाचा॥

## संपादकीय



# ।। मंगलाचरण ।।



कार्यारंभी मंगलाचरणाची परंपरा प्राचीन कालापासून चालत आलेली आहे. त्यामागे मुख्य उद्देश कार्य निर्विघ्नपणे पार पडावे व ठरल्याप्रमाणें ते शेवटास जावे असा असतो. पुष्कळदा आपण एखाद्या कामाची सुरुवात करतो. पुढे ते रेंगाळते व पूर्ण होईल की नाही याची शंका वाटते. अशा प्रसंगी काय करावे हे सुचत नसते. आपणापैकी बहुतेकांच्या जीवनात असें घडत असते. आपण त्याची कारणे शोधतो. निदान घडावे असे वाटत असल्याने शोधण्याचा प्रयत्न तरी करतो.

संकटे कांही सांगून येत नसतात. ती अकल्पित येतात. आगंतुकासारखी आपली वाटचाल अडवून ठेवतात. त्यांना सामोरे जावे की न जावे असा संभ्रम पडला तरी आलेल्या प्रसंगाला सामोरे जाण्याची गरज असते. ते प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. अर्थात असे नुसते म्हटल्याने गरजपूर्ति होते असे थोडेच आहे. कर्तव्य तर टाळता येत नाही पण पूर्वतयारी कोठे आहे अशीही परिस्थिती असते. कार्याची पूर्वतयारी करूनही ती वेळेवर आठवणे व तदनुसार घडवून आणणें या सगळ्याच जिकिरीच्या गोष्टीं होतात. मानवी जीवनाची ही अशी गडबड फार पूर्वीच ज्यांनी ओळखली त्यांनीच निर्विघ्नतेकरिता कार्यारंभी मंगलाचरणाचा दण्डक घालून दिला.

मंगलाचरण करण्याच्या अनेक पद्धति आहेत. 'अथ', 'स्वस्ति', 'श्री', 'ॐ' अशा नानाविध शब्दांनी मंगलाचरण केलेले आहे. पूर्व-मीमांसाकारांनी धर्मसूत्रे सांगतांना 'अथ' या शब्दाने– 'अथातो धर्मजिज्ञासा' अशी सुरुवात केलेली आहे. येथे 'अथ' हा मांगलिकाचा संकेत असून या सूत्रावरील भाष्यात तसे सूचित केले आहे. आज आम्ही 'श्रीगणेशाय नमः।' अशी सुरुवात करतो. साई सच्चरितकार कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर (हेमाडपंत) यांनी तर आपल्या ग्रंथारंभी मंगलाचरण केलेले आहेच पण प्रसंगा-प्रसंगाने त्याची पुनरावृत्ती केलेली आहे. त्यांत त्यांना संकटे येणार होती म्हणून नव्हे तर श्री साईबाबांच्या कृपेची त्यांना पदोपदी जाणीव होत असल्याने कृतज्ञतेने ते ईश-गौरव, साई-गौरव करताहेत.

सर्वसामान्यांना तसे करणे जमत नाही हे खरे. पण कार्यारंभ केल्यावर आम्ही 'श्रीगणेशा' केला असे म्हणतांना नकळत मंगलाचरण करीत असतो. हा वाक्प्रचार अंगवळणी पडला आहे. अर्थात् हे अंगवळणी पडणे साधी, सोपी गोष्ट आहे काय?

अनुभवातून होणाऱ्या संस्काराचा हा परिणाम आहे. परंपरेने हे आम्हास शिकविले आहे. ऋषि-मुनि, शास्त्रकार, साहित्यिक-महाकवि, पुराणकार, साधुसंत आदींनी हे संस्काराचे कार्य केलेले आहे. श्रीगणेश हा विघ्नहर्ता असल्याने त्याला प्रथम नमन आणि त्याचेबरोबर इतर देवतांना म्हणजे सरस्वती, शारदा, इष्टदेवता, कुलदेवता, ग्रामदेवता, इतकेच नव्हे तर साधुसंतांनाही या मंगलाचरणात सामील करून घेतलेले आहे.


या सर्व देव-देवतांनंतर कृतज्ञतेने सद्‌गुरुंना वंदन केलेले आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींची प्रतिभा तर सद्‌गुरुंच्या वर्णनांत रंगली व तेथेच रमली. त्यांच्या सद्‌गुरुंना – श्री निवृत्तिनाथांना त्यांना जागे करून आपल्या विषयाकडे, नियोजित कार्याकडे वळण्याची आठवण करून द्यावी लागली आहे. या अवतारी पुरुषाला कृतज्ञतेपुढे राहवले नाहीं. व त्यांनी सरस्वतीच्या दरबारांत ती अत्यंत प्रभावी पण हळुवार चित्ताने मांडली आहे. श्री निवृत्तिनाथांनाही तसे पाहिले तर आपल्या शिष्याला – बंधूंना परत वळवितांना जड गेले असावे.

मंगलाचरणाचा हाहि एक उद्देश आहेच. कार्यारंभी निर्विघ्नता हवी म्हणून आणि मधूनच कार्याचे भान रहावे, कार्य भलतीकडे जाऊ नये म्हणून मधूनमधून हे स्मरणकार्य सुरु ठेवलेले आहे. मंगलाचरण करणारे स्वत: समर्थ नव्हते काय? असा प्रश्न कृतज्ञतेपोटी गैरलागू ठरतो. औपचारिकपणा पेक्षा त्यांत अंत:करणाचा भाग अधिक आहे व कार्यातील अडचणींची सर्वसामान्यांना जाणीव रहावी हा शिकवणुकिचा भागही त्यांत आला.

गेली ६८ वर्षे श्री साईलीला मासिके विविध रूपांनी अवतरलेली आहेत. श्री बाबांच्या कृपेमुळे हा प्रवाह अखण्ड आहे. त्रैमासिकाकडून मासिकाकडे, मराठीबरोबर हिन्दी-इंग्रजी या भाषाभगिनींना स्वतंत्र संसार मांडून देईपर्यंत या वाटचालीत अनेक समर्थ साईभक्तांनी हातभार लावलेला आहे. या संपादकांनी आपल्या प्रभावी व समर्थ लेखणीने त्यांचे स्थान संस्मरणीय करून ठेवले आहे. त्यापैकी आज जे हयात नाहीत त्यांच्या स्मृतीला कृतज्ञतेने अभिवादन करीत आहोत. आमचे परममित्र श्री. चकोर आजगांवकर यांच्याकडून या पवित्र कार्याची सूत्रे हाती घेतांना संमिश्र भाव आहेत. त्यांना धन्यवाद देऊन कार्य संपणारे नाहीं कारण ते आपल्या परिवारातलेच झालेले आहेत.

श्री साईलीला मासिके ही श्री साईबाबांच्या अखंड सेवेचे व्रत घेऊन निघालेली आहेत. त्यांचा जीवनसंदेश सर्व दूर पोहोचवत असतांना धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे मानवी जीवनाचे पुरुषार्थ साधावयाचे आहेत. त्यांचाही मागोवा घेण्याचा संकल्प करून या प्रवाहात आम्ही सामील होत आहोत. यशाची जबाबदारी बाबांनी घेतलेलीच आहे.

**- डॉ. वि. वा. सातपूरकर** कार्यकारी संपादक



अध्यक्षा

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी**

विश्वस्त मंडळाच्या वतीने सर्व साईभक्तांना
हे प्रेमपूर्वक निमंत्रण देत आहे की.
दिनांक ४ मे १९९० रोजी
सकाळी १० वाजता शिरडी येथे



**''साईबाबा भक्त निवास''**

ह्या नियोजित इमारतीचा भूमिपूजन समारंभ



**मा. ना. श्री. रामराव आदिक**

मंत्री, अर्थ व नियोजन, महाराष्ट्र राज्य
यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

अध्यक्षा

**मा. ना. श्रीमती पुष्पाताई हिरे**

मंत्री, सार्वजनिक आरोग्य व सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य

प्रमुख अतिथी

**मा. ना. श्री. शंकरराव कोल्हे**

मंत्री, सहकार व दारुबंदी विभाग, महाराष्ट्र राज्य

सन्माननीय अतिथी

**मा. ना. श्री. लक्ष्मणराव हातणकर**

राज्यमंत्री, महसूल, सार्वजनिक बांधकाम, सहकार व पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य

आणि

**मा. खा. श्री. बाळासाहेब विखे पाटील**

सदस्य, लोकसभा

**श्री साईबाबांच्या शुभाशीर्वादांसह**

**श्री. के. पी. क्षीरसागर**
कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

**डॉ. लेखा पाठक**
अध्यक्षा
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

वास्तुशिल्पी – हफ़िझ कॉन्ट्रॅक्टर, आर.सी.सी. कन्सल्टंट : आर्. एच्. माहिमतुरा

# श्री साईबाबा भक्तांना नम्र आवाहन

शिर्डी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानाला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली कांही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिर्डीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखों भाविकांना शिर्डीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून संस्थानने सुखसोईमध्ये वाढ करण्याचे ठरविले आहे.

"साईबाबा भक्त निवास" अशी ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलले आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येतील. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय केली जाईल. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, अशा सभागृहाची योजना असून या दोन्ही सोयींमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असलेले एक खाद्य-पेय गृहही त्याच जागेत असेल.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन मंदिराच्या परिसराच्या नूतनीकरणाची योजना त्यानंतर हाती घेतली जाणार आहे. या नूतनीकरणामुळें श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

शिर्डी संस्थानच्या वतीने सध्याच्या १०० खाटांच्या इस्पितळाचा विस्तार, वैद्यकीय महाविद्यालय तसेच इंग्रजी माध्यमाची शाळा अशा आणखी योजना हाती घेण्यात येणार आहेत. औद्योगिक प्रशिक्षण शाळेची योजना पूर्णावस्थेत असून ७० खोल्या असलेल्या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ लवकरच करण्यात येणार आहे.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थानने वरील नमूद केलेले महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्वल सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता देणगी दिल्याने होणार आहे.

शिर्डी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणास या कार्याकरिता उदारहस्ते

मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

आपल्या देणग्या खालील पत्यावर पाठवाव्यात :-

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी.
मु. पो. शिरडी, तालुका: कोपरगांव
जिल्हा अहमदनगर.

सूचना: चेक ''श्री साईबाबा संस्थान, शिरडी'' या नावाने पाठवावेत.

– निवेदन –

कांही तांत्रिक बाबींच्या पूर्ततेकरिता मार्च ९० चा अंक आम्ही आपणास वेळेवर देऊन शकलो नाहीं. त्यामुळें एप्रिल ९० चा साईलीलेचा अंकही उशीरा बाहेर पडला. आम्ही याबाबतीत दिलगिरी प्रकट करीत आहोत. दोन्ही अंक पोस्टाने रवाना झालेले आहेत. श्री साईलीला सभासदांनी कृपया याची नोंद घ्यावी.

कार्यकारी संपादक

– साई पंचसूत्री –
सद्धर्म, सदाचार, सन्नीती, श्रद्धा, सबुरी

''सर्व अनर्थाचे मूळ हें शरीर व त्याचा आधार घेऊन रहाणारा अहंकार हा आहे; त्याची आपल्यासमोर धुनीत राखरांगोळी करून नांव, गांव, जात, गोत, कुल व कीर्ति या सर्वांची रक्षा करून स्थितप्रज्ञ मन:स्थितीत बाबा रहात.''

# संत-स्वरूपाची ओळख सर्वांनाच का होत नाहीं?

वैद्य भाऊसाहेब कुलकर्णी, वडाळा.

वैद्य भाऊसाहेब कुलकर्णी हे श्री साईबाबांचे जुने व जाणते भक्त आहेत. वैद्यक क्षेत्रातील महाराष्ट्रात दुर्मिळ होत चाललेल्या सिद्ध-रसायन औषधांच्या परंपरेतील ते बहुधा एकमेव वारसदार असावेत. वैद्यकीय ज्ञानाबरोबर अध्यात्म, धर्म, तत्त्वज्ञान यांचे ते गाढे अभ्यासक आहेत.

कार्यकारी संपादक

य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्य संशय:॥ गीता.

श्री द्वारकाधीशाचें प्रत्यक्ष मुखांतून भगवत्गीतेंत त्यांच्या पराभक्तीची जीं बरींच वर्णनें ठिकठिकाणीं आली आहेत त्यांत वरील श्लोक अत्यंत महत्त्वाचा आहे. या श्लोकाची भूमिका फार खोल आहे. प्रत्यक्ष सद्‌गुरुंना उद्देशून हा श्लोक आहे. संत हे परमेश्वराची पराभक्ती कशा रीतीनें करतात हे या श्लोकात दर्शविलेले आहे. सद्‌गुरुची व्याख्या करतांना शास्त्रकारांनी दोन गोष्टींचा उल्लेख केला आहे. एक त्यांचे श्रोत्रियत्व व दुसरें त्यांचे ब्रह्मनिष्ठत्व. श्रोत्रिय म्हणजे विषय स्पष्टपणें समजावून देण्याची कला. 'जो शब्दज्ञाने पारंगतु। आत्मानुभवें डुल्लतु' यांतही हेंच स्पष्ट केलें आहे. जो विषय किंवा जें तत्त्व तें समजावून देतात त्याविषयीं शब्दज्ञानाबरोबर प्रत्यक्ष अनुभव करून देणें हा अधिकार संतांचा असतो. बोलाचीच कढी, बोलाचाची भात। जेवूनियां तृप्त, कोण झाला॥ असा शब्द पांडित्याचा बाजार तेथें नसतो.

## सद्‌गुरुमहिमा मोठा आहे

सद्‌गुरुमहिमा फार मोठा आहे. तो इतका कीं, त्याचें वर्णन प्रत्यक्ष भगवंतांनी

फार ठिकाणीं केलेलें आहे. भगवंताला त्याचे भक्त इतके प्रिय असतात कीं, त्याच्याकरितां परमेश्वरानें काय केलें नाहीं ? हाच प्रश्न उलट विचारावा लागेल. भक्तांचें पदरज आपल्या मस्तकावर पडावे म्हणून परमेश्वर भक्तामागें धावतों. आपल्या हातांत धरलेले कमळ देवानें केवळ भक्त भेटतांक्षणींच त्याची पूजा करितां यावी म्हणूनच धरलेलें आहे. अशीं काव्यमय वर्णनें ज्ञानेश्वरींत बरीच आलेली आहेत. यांतला मतितार्थ आमच्या लक्षांत येत नाही. भक्त मोठे कीं भगवंत मोठे याचा वाचकांना गोंधळ पडतो. भक्तांची भूमिका स्पष्ट होण्याकरितां श्री ज्ञानेश्वरांनी निरनिराळ्या उपमा देऊन भक्तमहात्म्य अपूर्वतेनें वर्णिलें आहे.

वरील श्लोकांत आपल्या भक्तांची पराभक्तीची रीति सांगितली आहे. "हें माझें परम गुह्य ज्ञान जो माझे विषयी अज्ञान असणाऱ्यांना सांगून सज्ञान करील त्यानेंच माझी सर्वश्रेष्ठ भक्ती केली आहे, व तोच ही भक्ती करून माझ्या स्वरूपाला येऊन मिळेल हे निःसंशय समज."

## संतांचा अधिकार

वरील श्लोकाप्रमाणें पाहूं गेल्यास हा अधिकार फक्त संतांचाच आहे. 'जें जें आपणासि ठावें। तें तें दुसऱ्याशी शिकवावें। शहाणे करून सोडावे। सकळ जन' ही समर्थोक्तीही हेंच सूचित करते.

संत आपल्या अधिकारी शिष्याला 'आपणासारखे करिती तात्काळ। नाहीं काळवेळ तयांलागी।' कोणत्याही गोष्टीला अधिकार हा लागतोच. खडकावर बीजारोपण निष्फळ असतें. संतकृपा होण्यास आपण योग्य अधिकारी बनणें ही फार महत्त्वाची जबाबदारी आपणावर आहे.

ब्रह्मानुभव देण्याची संतांची रीति शास्त्रकारानें कांहीं ठिकाणीं वर्णिली आहे. दर्शनात्, स्पर्शनात्, शब्दात्, कृपया, कृपादृष्टीनें, सद्गुरुनें शक्तिपात करून आत्मानुभवी झालेल्यांची उदाहरणें पुष्कळ आहेत. वरदहस्त मस्तकीं ठेवून किंवा उपदेश करून, किंवा मनोमय कृपा करून अनुभव देणारे महात्मे आपणाकडे बरेच झालेले आहेत.

श्री बाबा हे अशाच महान अधिकारी विभूतीं पैकीं आहेत. आपण जो जो विचार करूं लागावें तो तो मती गुंग होण्याचा प्रसंग अनुभवास येतो. श्री बाबांनी कधीं ही ब्रह्ममायेचा कोरडा काथ्याकूट कोणाशी केला नाहीं. कोणालाही कान फुंकून शिष्य केलें नाही. इंग्रजांसारखी परधर्मीय राजसत्ता असतानां फोडा-झोडा तत्त्वानेंच राज्यकारभार चालू असतांना एक व्यक्ति मशिदींत येते काय व मुसलमानांना अत्यंत चीड आणणारी कृत्यें करते काय व ती कृत्यें परधर्मीयांकडून बिनतक्रार सहन केलीं

जातात हें मोठें आश्चर्य. ज्या कालांत मशिदीवरून वाद्य वाजविणें म्हणजे दंग्याचेंच आव्हान समजलें जात असें, त्यावेळीं शिरडीस मशिदींत घंटा वाजत असत, आणि धुनी आपल्या सामर्थ्यानें धगधगत असे. उभ्या आयुष्यांत एकदा वेदांत चर्चा जालेली त्यांच्या ओवीबद्ध चरित्रांत दिसते, ती म्हणजे त्यांच्या सान्निध्यांत गीता पाठ करणाराला त्यांनी कुतुहलानें प्रश्न केला तेवढाच. पाठ करणारे गृहस्थ खालील श्लोक पुटपुटत होते. 'उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानम् ज्ञानीनस्तत्त्वदर्शिन:।' यांत इतकेंच सूचित केलें कीं, शब्दानें फक्त अज्ञान काय हेंच उपदेशिणें शक्य आहे. शब्दानें ज्ञानाचा अनुभव देतां येत नाहीं आणि शास्त्रत: तें बरोबर आहे. 'यतो वाचा निवर्तन्ते' हा श्लोक हेंच दाखवीत आहे. यावरून संतांचे निरीक्षण किती खोल व परिपूर्ण असतें याची कल्पना होईल, पण ती त्यांची पूर्णतेची अवस्था सामान्य जनाला ओळखतां येणें सहजसाध्य नसतें. सत्य परीक्षक दुर्मिळ असतात. श्री ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणें : योगी ओळखावा योगेश्वरें। ज्ञानी ओळखावा ज्ञानेश्वरें। महाचतुर तो महाचतुरें। ओळखावा॥ समान भूमिकेवर आल्याखेरीज ओळख होणें कठीण असतें. सत् तत्त्वांत विलीन झालेल्या महात्म्यांची ओळख होण्याला आपणही तो अधिकार मिळवूनच गेलें पाहिजे. ब्रह्म होऊन ब्रह्म अनुभवावें. ब्रह्माचा अनुभव ब्रह्म होऊनच घ्यावा लागतो. वाचा, मन, बुद्धि यांना तो अशक्य आहे. श्री बाबा हे अशा अचिंत्य अवस्थेंत होते. कल्पनातीत अवस्थेंतील कल्पना कल्पनेनें कशी येणें शक्य आहे?

## बाबांची साधना

श्री बाबांची साधना काय होती, ते कोणत्या उपास्य देवतेच्या साधनेंत होते हें कोणालाही कांहीच समजण्यासारखें नव्हतें. ते हिंदूंच्या देवांची पूजाअर्चा, विधी या कर्मठमार्गाचे कर्मळ जंजाळांतही कधीं नव्हते व म्लेंच्छांच्या रिकाम्या नमाजाच्या आडाओरडींतही नव्हते. **सर्वांभूतीं सहजसाक्षित्वानें प्रकाशणाऱ्या आत्म्यांत तें** विलीन झालेले होते. ज्या भूमिकेंत मन गेलें कीं पुन्हां तें परत कधींही येत नाहीं, अशा परिपूर्ण अवस्थेंत ते होते. 'यद्‌गत्वा न निवर्तन्ते तत्‌धाम परमं मम्।' सहज उत्तम अवस्थेंत ते मस्त असत. मस्त म्हणजे मीपणाचा ज्यांचा अस्त झालेला आहे ती परमोच्च अवस्था. मीपणाचे फवारे अनंत मार्गानें वृत्तिरूप धारण करून अज्ञानावस्थेंत आत्मप्रकाशावर ढगाप्रमाणें आच्छादन करीत असतात. सर्व अनर्थांचें मूळ जें शरीर व त्याचा आधार घेऊन रहाणारा अहंकार, त्याची आपल्यासमोर धुनींत राखरांगोळी करून नांव, गांव, जात, गोत, कुल, शील या सर्वांची रक्षा करून स्वस्थ झालेल्या स्थितींत ते असत. स्वस्थ शब्दहीं हेंच सुचवितो. स्वस्मिन् स्थित:। स्वात्म्यांत स्थित झाल्याखेरीज स्वास्थ्य येणार नाहीं. हेंचे तें संतांचे स्थान ; हीच ती कृतार्थतेची स्थिती!

ज्या सुखाकरितां सर्व प्राणिमात्र धडपडत आहेत व जें त्यांचे कल्पनेंतही येऊं शकत नाही. ती हीच स्थिती. येथेंच तो कृतार्थ होतो. कर्तव्याकर्तव्याच्या जंजाळातून तो मोकळा होतो. सत् तत्त्वांत त्याचा अंत होतो. हेंच तें आपले मरण. व्यक्तित्व संपूर्णतेनें नाहींसें होऊन अखंड स्थितीचे जीवन येणें हीच ती किमया. ऋषि-मुनींनीं शेकडों वर्षे तपें करुन शोधून साधलेली ती हीच अवस्था. व्यक्तित्व हे क्षणिक आहे. सत् तत्त्व हें अखंड आहे. आपलें अस्तित्व अखंड असावे हीच प्राणिमात्राची सुप्त इच्छा असते. मरण कोणालाही नको असतें. अमृतत्त्वाकरितांच जीवमात्राचा अखंड प्रयत्न असतो. परंतु त्याचें स्थान अज्ञान अवस्थेंत निश्चित होत नसतें. दिवा घेऊन अंधार शोधण्याच्या कृतीप्रमाणेंच विफलता पदरीं पडते. त्यांतून सोडवणूक करून घ्यावयाची असल्यास संतांना शरण जाणें हा एकच मार्ग आहे. सर्व धर्मामाजी परमधर्म। स्वरूपी रहाणें हाच स्वधर्म।। अशा धर्माच्या प्रतिष्ठेकरितां श्री भगवान गीतेमध्यें 'सर्वधर्मान् परित्यज्य माम् एकम् शरणं व्रज।।' अशी ग्वाही देत आहेत. अशा परमधर्माचरणांत संत असतात — त्यांचे भक्तीचें स्वरूप वस्तुतंत्र असते. म्हणजे परमेश्वर व आपण एकरूप या अखंड अनुभवांत ते असतात. कर्तृतंत्राचा तेथें संबंधच येत नाहीं. 'जें अभ्यासें अभ्यासितां न ये। जें साधनें साधितां नये।।' ही ती स्थिती. अशा कल्पनातीत स्थितींत असलेल्या संतांचे स्वरूपाची ओळख सामान्य जनाला सहजासहजीं होत नाहीं. ती अनुभवानेंच पायरी पायरीनें होऊ शकते. श्री बाबांच्या कल्पनातीत स्थितीचा आपण जसा यथामती विचार केला तसा त्यांचे व्यावहारिक बाह्य कृतीचा थोडा विचार करूं.

## न बोलतां करी देव, त्याचा कैवारी

श्री बाबांची अथपासून इतिपर्यंत सर्वच कृती उपदेशाची; पण तें घेणाराला. श्री ज्ञानेश्वरांना जसे नदी, दिवा, पृथ्वी, वृक्ष इत्यादि सर्वांपासूनच शिक्षण मिळत असें, तसें काव्यदृष्टीनें जगाकडे पहाणाऱ्याला सर्व जग गुरुप्रमाणें एकच गोष्ट दाखवितें. सर्वांत समन्वय आहे असें दिसेल. सर्व जगाचे व्यवहार ज्या पंचभूतांच्या आधारावर चालतात, ते सर्व विरूद्ध धर्मवान् असूनही जगताचें भरण-पोषण करतात असेंच दिसते. तसेंच संतांनीं जो आपल्या आचारानें आपला उपदेश केवळ बोलून न दाखवितां कृतीनें दाखविला तो केव्हांही अधिकच परिणामकारक व टिकाऊ असतो.

कोणाही व्यक्तीला आपल्या नांवाचा, लौकिकाचा, घराण्याचा, जातीचा, देशाचा केवढा तरी अहंकार असतो. परमार्थमार्गामध्यें अहंकारासारखा दुसरा शत्रू नाहीं असें वर्णन सर्व संतांनीं केलेलें आहे. **मुख्य ते गळाली पाहिजे अहंता। उपदेश घेतां गोड वाटे।** तसेंच, अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझीया विष्णुदासा

भाविकाशीं। ममत्व सुटणें, अहंत्व सुटणें फार कठीण आहे. तें प्रत्यक्ष सुटलेलें कोठे पहावयाचें असेल तर संतांच्या आचारांत पहावयास सापडते. द्रव्याचा मोह, स्त्री-मोह, नांव लौकिकाचा मोह हे अत्यंत अनावर म्हणून शास्त्रकारांनी वर्णिलेलें आहे. ज्ञानेश्वरांनीं तर त्यांचे अगदीं काव्यात्मक वर्णन करून योग्य संभावना केली असून, त्यांचे स्वरूप स्पष्ट केलेलें आहे. "हे तो भजन मार्गीचे मार्ग। मारक ऐसे॥" इत्यादि. इतकी बलवत्तर पकड वरील विकारांची असतांना संत-महात्मे यांचे आचरणांत आपणाला त्यांचा मागमूसही दिसत नाही. श्री बाबांचे चरित्रावरून आपणास हें स्पष्ट दिसून येतें.

## न कळे कोणाला हेंच त्याचे वर्म। तुकाराम

जसा ब्रह्माला अनादि शब्द यथार्थ शोभतो तसेंच श्री बाबांचे ही दिसते. त्यांच्या जन्मस्थानाचा निश्चित पत्ता अद्याप नाहीं. कदाचित् पोरकें पोर एखादें असूं शकतें; परंतु इतर जवळपासचे नातेवाईक किंवा बांधववर्ग सर्वच कांही एकाच वेळी नाहींसा होत नाही. निदान इतक्या योग्यतेस पोहोंचलेल्या व्यक्तीच्या भाऊबंद मंडळीपैकीं कोणीही आपल्या कुळांतील ही संतव्यक्ती आहे असें अद्याप येऊन स्पष्ट सांगूं शकत नाहीं. असो.

देह प्राप्त झाला तो जगरहाटीप्रमाणें कोणातरी महान स्त्री-पुरुषापासूनच झाला असणार हें खरें, आणि तसा जन्म प्राप्त होणें कांहीं सदोष आहे असेंही नाहीं. प्रत्यक्ष श्रीनिवृत्ति, ज्ञानदेव, इत्यादि संत-महात्मे यांनाही जगरहाटीच्या नियमाप्रमाणेंच आपले देह घ्यावे लागले. असा देह मृत्युलोकांत प्राप्त होण्याकरितां प्रत्यक्ष देवसुद्धां इच्छा करतात. 'इहलोकींचा हा देह देव इच्छिताती पाहे।' असो. हा जन्माचा प्रश्न झाला. तो एक कुतूहलाचा प्रश्न होऊन बसला आहे. तो प्रश्न निर्णयात्मक न सुटल्यामुळें त्यांच्या जातींविषयींहीं अनेक कल्पना अनेकांकडून केल्या जात आहेत. विचारपूर्वक पाहूं गेल्यास सृष्टीनिर्मात्यानें स्त्री-पुरुष या दोनच भिन्न सृष्टींची उत्पत्ति केली. मनुष्यानें मात्र त्यावर मात करून आपल्या सात्त्विक, राजस, तामस, गुण कर्मविभागानें अनेक जाती निर्माण केल्या व वर्गकलहाची उत्पत्ति केली. गुणकर्मविभागश:शा भिन्नत्व निराळें आणि जातीय विभाग निराळा. गुण व कर्म या नियमानें असलेलें भिन्नत्व फार सौम्य असूं शकेल. जन्माप्रमाणें जात ठरणें हें त्याचे विकृत स्वरूप आहे. मनुष्यजात जी परमेश्वरानें निर्मिली त्यांत आम्ही हिंदु, आम्ही इंग्रज, आम्ही मुसलमान वगैरे जें भिन्नत्व आपण आज पहातों व त्याचे अमानुष परिणाम पहातों व भोगतों तें मनुष्यवृत्तीचें फळ आहे. खरोखरीनें पाहूं गेल्यास प्रत्येक प्राणीमात्राची शेवटची अवस्था पंचभूतांत विलीन होणे ही स्पष्ट दिसत असतांना जीवित असेपर्यंत मात्र आम्ही पूर्ण भिन्नत्वांत जीवन कष्टमय करून घेतलें आहे.

परमेश्वरानें सूर्य, पृथ्वी, इत्यादि पंचभूतें निर्माण केलीं तीं मात्र ख्रिश्चन, मुसलमान, हिंदु या सर्वांची एक व परमेश्वर मात्र निराळा, हा कोठला विचारीपणा? वास्तविक मुसलमानांचा अल्ला, ख्रिश्चनांचा आकाशांतला बाप व हिंदूंचा परमेश्वर सर्व एक आहेत, हें जर सर्वांच्या अनुभवांत आलें तर धर्मयुद्धें तरी खास होणार नाहींत. हिंदुधर्मांत मात्र स्वामीभाव आहे. परमेश्वर व भक्त भिन्नस्वरूप नसून एकरूप आहेत. इतर धर्मापेक्षां वैदिकधर्मात वैशिष्ट्य आहे तें हेंच. वैदिकधर्माचा भौतिकशास्त्राशीं विरोध येणें कधींच शक्य नाहीं. ख्रिश्चन धर्माशीं भौतिक शास्त्रज्ञांचा जो विरोध आलेला दिसतो त्याचें स्पष्टीकरण हेंच आहे.

जगाच्या अंतिम तत्वाच्या शोधार्थ शास्त्रज्ञ आयुष्याचें आयुष्य खर्च करीत आहेत. त्याच अंतिम तत्त्वाचा संपूर्ण शोध करून स्वानुभवांत रंगलेले आमच्याकडील संत-महात्मे आहेत. शास्त्रज्ञांना बुद्धीच्या करामतीवर एखाद दुसरा निसर्गातला नियम सांपडतो न सांपडतो तोंच इतर अनंत अगम्य तत्त्वें मन:चक्षू पुढें उभी रहातात; व अज्ञानाचा पडदा अधिक गडद झालेला दिसतो. वैदिक परंपरेंत या जगताच्या शोधार्थ अनेक प्रयत्न पूर्वजांनी करून, हें जग अनंत आहे हा निश्चित सिद्धांत बुद्धिवर ठसवून त्याही पुढें जाऊन जगाच्या अंतिम तत्त्वावर बुद्धि स्थिर करून ब्रह्मानुभवांत बुडी घेतलेली स्पष्ट दिसत आहे.

प्रश्न उत्पन्न होतो तो फक्त इतकाच कीं, हा ब्रह्मानुभव कसा मिळवावा हाच. पाश्चात्या बुद्धिवादी वर्गांत याबद्दल फार चिकित्सक दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत. 'रिझनिंग अँड फेथ' हा वाद तीव्रतेने तिकडे अनेक विद्वान लेखकांनी माजविला आहे. बुद्धीचा प्रांत संपल्याशिवाय श्रद्धेच्या प्रांतांत शिरकांव होणें शक्य नाही. अंतर्मुखतेनेंच तें शक्य आहे. त्या अंत:र्मुखतेकरितां संतमहात्मे यांचे सहाय्य लागते. सद्‌गुरुवांचोनी सांपडेना सोय! धरावे ते पाय आधीं आधीं॥ ही समर्थोक्ति त्या ठिकाणीं यथार्थ वाटते. बुद्धीचा प्रांत सुटणार कसा व श्रद्धा निर्माण होणार कशी? 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्।' ही उक्तीच यथार्थ आहे. 'बुद्धिवान् लभते ज्ञानम्' हें जगाचें अधिभौतिक ज्ञानांत अंशत: सत्य आहे. या बुद्धीचे अपूर्णतेमुळें साधक पुष्कळ श्रवण करूनही असाहाय्य होतो. बुद्धिवादाप्रमाणें इथपर्यंत येऊन अनेक तऱ्हेचे इथर्स आहेत असें कळून इथरमधील कार्यकारणांची परंपरा कोणाकडे व कां द्यावयाची हें निश्चित होत नाहीं व बुद्धि लंगडी पडते त्यावेळीं न वचसा न मनसा न बुद्ध्या।, या शास्त्रवचनाची प्रचीती येते. अशावेळीं निश्चयात्मक परमेश्वरी अनुभव करून देणाऱ्या संतमहात्म्यांखेरीज मनाला कोणाचाच आधार सांपडत नाहीं. ते मात्र याच देहीं याच डोळां मुक्तीचा सोहळा।, अशा निश्चयानें जगताचे आदितत्त्वाचा अनुभव करून देण्याची जबाबदारी घेतांना दिसतात, व मनुष्य

सहाजिकच त्यांचेकडे वळतो, 'तुका म्हणे माझा संतांवरी विश्वास।' कां तर 'तेची माझें हित करीती सकळ।' या ठिकाणीं हित म्हणजे व्यावहारिक हित इतका क्षुद्र अर्थ न घेता तुकाराम महाराजांचे दृष्टीनें आत्महित अभिप्रेत आहे.

## संतांना जात नसते

आम्हीं आज श्री बाबांकडे याच आशेनें पहात आहोत. ते आज जग सोडून गेले असले तरी ते आहेत असा अनुभव येतो, 'काया गेली खरी। परी मी आहें जगदंतरी।' ही उक्ती सार्थ वाटते. याच अनुभवानें प्रत्येक भक्त शिरडीस धांव घेत आहे. प्रश्न इतकाच आहे कीं, आज ते शरीरधारी नसतांना ते मार्गदर्शन कसे करणार व आम्हीं तें कसें करून घेणार? आमची प्रार्थना त्यांना कोठल्या भाषेनें कळत असेल? प्रश्न आपण पुन्हा केव्हांतरी पाहूं. मुख्यत: श्री बाबांची जात कोणती हा प्रश्न आपणांपुढें आहे. संतांची जात ठरलेली नसते. संतांची जात कोणती हें तुकाराम महाराज सांगतात त्याप्रमाणे संतांना जात नसते. त्यांना फक्त त्यांचे जातीचा मनुष्य हवा असतो. 'माझ्या जातीचा मज भेटो कोणी। आवडीची धनी पुरवीं देवा', त्यांचा एकच जात; ती म्हणजे, पशुत्वांतून मनुष्यत्वांकडे व मनुष्यत्वांतून देवत्वाकडे नेणारी माणुसकीची जात त्यांना हवी आहे. ज्यांनी आपलें नांवगांव यांचा संकुचित विचार सोडला, त्यांना जातीचा विचार कोठला? माणसानें माणसासारखें वागावें. मनुष्यत्वानें रहावें. मनुष्यत्व म्हणजे काय? मननशील रहाणें हा मनुष्यधर्म. आपणांस जसे व जें हवें तसेंच इतर मनुष्यांसही हवें अशा आत्मोपम्य बुद्धीनें वागणें ही समत्वबुद्धि मनुष्यधर्माची मुहूर्तमेढ आहे. त्यांत जात, देश, वंश, जमात यांचा विचार गौण आहे. श्री रामतीर्थ म्हणत कीं, माझा आंगरख्याचा एक खिसा हिंदुस्थान आहे तर दुसरा खिसा विलायत आहे. मुद्दा काय कीं महात्म्यांची दृष्टी आपल्या देशबांधवांचेंच फक्त कल्याण व्हावें इतकी संकुचित नसून अखिल मानव जातीसंबंधी विचार करणारी असते. आपले साने गुरुजी नेहमीं उपदेश करीत त्याप्रमाणें आपण सारे भाऊ भाऊ हेंच तें मानवाचें मनुष्यत्व.

याच मनुष्यत्वानें श्री बाबा आयुष्यभर वागले. 'अल्ला ईश्वर एकच देव। राम रहिम हें एकची नांव।' ही उदात्त शिकवण त्यांची आचरून दाखविली. मंदिरांत नमाज पढला जातो व मशिदींत भजन होतें ही कृती काय दाखविते? आपल्या एकत्वाचे प्रभावानें अल्ला ईश्वराचें एकत्व सिद्ध करतें.

## मानव्याची दृष्टि

हीच मानव्याची दृष्टि आम्ही, श्रीमंत-गरीब, मालक-मजूर, अधिकारी-सेवक, इत्यादि भिन्न वर्गांत ठेवून वागू लागलो तर आम्हांला आज दिसणारा जातीयतावाद

व विषमता यांना थोडाही थारा न मिळून स्वराज्याचें सुराज्य होण्यास कालावधी लागणार नाहीं. 'हेच थोर भक्ती आवडते देवा।' परमेश्वराचें निश्चित स्वरूपासंबंधीं तुकाराम महाराजांचें खालील वचन फार महत्त्वाचें आहे. 'प्रीती जे स्वपुत्राशीं तेच दासा आणि दासी। तुका म्हणे सांगू किती, तेचि भगवंताची मूर्ती।'

संतांच्या कार्याचे महत्त्व आहे तें हेंच. जें कार्य राजदंड करूं शकत नाहीं, जें कार्य राजा करूं शकत नाहीं तें कार्य संत-महात्मे सहज करूं शकतात.

**न राज्यं नैव राजाच, न दण्डं यो न च दाण्डिक:।**
**धर्मेणैव प्रजा सर्वे रक्षामी स्म परस्परम्।**

अनेक आपत्ति आल्या, अनेक राज्यक्रांतींना आम्हांस तोंड द्यावें लागले तरी संतांच्या धर्मकार्यामुळें आमची संस्कृती टिकली, याचें एकच कारण श्री संत, महात्मे यांनीं आमची निश्चित ठेवलेली धर्मबुद्धि. आमच्याकडे शिक्षणाबरोबर संस्कृतीला स्थैर्य आलें तें संतांच्या शिकवणींचें महात्म्य आहे. शतकानुशतकें लोटलीं तरी 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' या गर्जनेनें आम्हीं सर्व एकजीवन होऊ शकतों हें आजही सर्वांना दिसतच आहे. हाच अनुभव श्री विवेकानंद परदेशांत जाऊन गर्जना करून परधर्मीयांपुढे वर मान करून मोठ्या अभिमानाने आमच्या देशाबद्दल व धर्माबद्दल बोलताना काढतात— 'Religion is the back bone of India.' आणि आजही आपण जात, पात, वय, धंदा, गरीबी, श्रीमंती, अधिकार ह्या सर्व भेदांना विसरून श्री संतपदीं एकरूप होत आहोंत हा महान् भाग्याचा दिवस आहे. हींच सर्वांची बुद्धि दृढ होण्याकरितां आपण सर्वजण श्रीसंतशिरोमणी ज्ञानेश्वर यांच्या शब्दांत परमेश्वराची प्रार्थना करून कृतार्थ होण्याकरितां दान मागूं–

**आता विश्वात्मकें देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे।**
**तोषोन मज द्यावे। पसायदान।।**
**जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मी रती वाढो।**
**भूतां परस्परें पडों मैत्र जीवाचे।।**
**दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।**
**जो जे वांछील तो तें लाहो। प्राणिजात।**

# परमेश्वर, संत आणि भक्त

पौराणिक काळापासून निस्सीम, अव्याज भक्ती ज्या परमेश्वराच्या किंवा संतांच्या पायाशी रुजू झाली त्यांनी आपल्या भक्तांची संकटांतून सोडवणूक केली आहे त्यांना योग्य मार्गदर्शन केले आहे.

आपल्या नेसत्या गडदगार गर्भरेशमी भरजरी साडीचा पदर क्षणाचीहि उसंत न घेता फाडून श्रीकृष्णाची रुधिरलाल करंगळी बांधायला धावणारी भावभक्तीची मूर्तिमंत द्रौपदी आठवा. द्रौपदीची कृष्णाप्रती असलेली अव्याज, मनोहर भावभक्ती, अभंग विश्वास आणि या नितांत सुंदर भावभक्तीचा 'मी कसा होऊ कसा उतराई' अशी श्रीकृष्णाची झालेली स्थिती मला स्पष्ट प्रतित होते भावभक्तीचा केवढा हा महिमा !

वस्त्रहरणाच्या वेळी आपल्या अब्रूचा रक्षणकर्ता फक्त केवळ श्रीकृष्णच आहे त्याला शरण जावून हे गोविंदा ! आता माझी लाज राखणारा फक्त तूच, माझे रक्षण केवळ तूच करशील तेव्हा क्षणाचाहि विलंब न लावता धावून ये ! अशी आर्ततेने हाक मारताच अगणित वस्त्रे पुरवून श्रीकृष्णाने तिची लाज राखली.

श्रीकृष्णाने द्रौपदीच्या असाहाय्य अवस्थेत तिच्या आर्त हांकेला 'ओ' म्हणून दिलेला प्रतिसाद, किती त्रैलोक्य सुंदर, उध्वस्त होवू घातलेल्या असहाय्य उदास मानवी मनाला दिलासा देणारा तारणकर्ता, विश्व व्यापून राहीलेला.

महाभक्त प्रल्हादाची गोष्ट आपल्याला, माहिती आहेच. भक्त प्रल्हाद हा नामस्मरणाचा मूर्तिमंत अवतार होता. त्याच्या मनात भगवंताबद्दल अतीव प्रेम होते. चालता बोलता आपण भगवंताच्या कुशीत आहोत असेच त्याला वाटत असायचे. प्रल्हादाच्या जन्मदात्या पित्यास हिरण्यकश्यपुस अहंकारामुळे आपणच तिन्हीं जगाचा स्वामी आहे असे वाटे. प्रल्हादाचे नामस्मरण त्याला आवडत नसे. तिन्ही जगांचा स्वामी मीच असता कुठे आहे तो तुझा ईश्वर असे त्याने प्रल्हादाला विचारले. प्रल्हाद म्हणाला की, ईश्वर सर्वत्र आहे. जळी, स्थळी, काष्टी, पापाणी अगदी सर्वच ठिकाणी या समोरच्या खांबांतहि त्याचे वास्तव्य आहे. असे म्हणताच हिरण्यकश्यपुने खांबावर लाथ मारली. तोच काय चमत्कार झाला भगवान नृसिंह रुपाने खांबातून प्रकटले व प्रल्हादाला त्रास देणाऱ्या त्या दैत्यराजाला ठार केले व प्रल्हादाला त्रास देणाऱ्या त्या दैत्यराजाला ठार केले व प्रल्हादाला जवळ घेवून प्रेमाने अलिंगन देवून परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार घडविला.

गोकुळातल्या गोपिकांचे श्रीकृष्णावर निस्सिम प्रेम होते. ब्रजवासी गोपिकांनी भगवंताच्या हृदयात ठाण मांडले होत. श्रीकृष्ण दर्शनाच्या इच्छेने तहानभूक विसरणाऱ्या या गोपिकांचे चरित्र तर स्वतः भगवंतानीच गायले आहे. श्रीकृष्णाच्या भक्तिने तहानभूक

विसरणाऱ्या या गोपिकांना गिरीधर गोपाला शिवाय काही सुचतच नसे.

ज्याने परमात्मतत्त्व जाणलेले व अनुभवलेले असते त्यांना आपण संत म्हणतो. संत हा ईश्वर व भक्त यांना सांधणारा दुवा असतो. श्री साईबाबा हे अशाच उच्चकोटीतील संत होत.

श्री साईबाबा या नांवाने संपूर्ण भारतवर्षावर विलक्षण मोहीनी घातली आहे. आस्तिकांचे ईशप्रेम वाढीस लावून त्यांना आत्मोद्धाराचा मार्ग दाखविला. बाबांजवळ आईची ममता, मात्यापित्याची वत्सलता होती. करुणता, प्रेमळपणा होता. संसारातील दुःखे. विवंचना यांनी ग्रासलेला माणूस त्याच्याकडे जायचा व समाधानाने घरी परत जायचा. त्यांनी केलेल्या चमत्कार पाहून जगात ईश्वर आहे याची त्याला खात्री पटायची.

अखिल ब्रह्मांडावर सत्ता गाजवणारी कतुम अकर्तुम अशी एकच शक्ती आहे. हिंदु त्याला भगवान, ईश्वर म्हणतात मुसलमान त्याला अल्ला म्हणतात, ख्रिश्चन त्याला गॉड (God) म्हणतात. बाबांनी धर्मा-धर्मातील भेद दूर करुन मानवधर्म हा श्रेष्ठ धर्म आहे हे शिकविले. म्हणून त्यांनी जातपात, धर्म, संप्रदाय हे भेद कधीच मानले नाहीत.

बाबा अनेक भक्तांकडून दक्षिणा मागून घेत व नंतर ते पैसे गोरगरीब व गरजूंना वाटून टाकत. बाबा ज्यावेळी समाधिस्त झाले त्यावेळी त्यांच्याकडे फक्त सोळा रुपये होते. मानवाने पैशाचा लोभ करु नये, संग्रह करु नये त्याने अध्यात्मात अडथळा येतो. आपले लक्ष पैशापेक्षा ईश्वराकडे अधिक हवे अशी त्यांची शिकवण होती. आपल्या उत्पन्नातील काही भाग गोरगरीब व दीनदुबळे यांच्यासाठी खर्च करा अशीहि त्यांची शिकवण होती.

साईबाबा हे जणू कारुण्य आणि दया यांची चिरधन मूर्ति होती. सर्वजग मानवामानवातील प्रेमरज्जुनी जोडून एकविश्व कुटुंब निर्माण होवू शकेल अशी त्यांची धारणा होती. निष्ठा आणि सबुरी या द्वारेच ईश्वरप्राप्ति होवू शकेल असे ते म्हणत.

मानवी जीवनांत मांगल्य निर्माण व्हावे, आपापसातील भेदभाव विसरुन, ईश्वर एकच आहे. हे सर्वांना पटावे यासाठी ते कार्यरत राहीले. अशा या साईरुपी ईश्वराकडे व्यावहारीक मागणे न मागता सच्चिदानंद स्वरुपाचा आत्मप्रत्यय देण्यासाठी त्याची मनोभावे प्रार्थना करु या, सेवा करु या.

**- सौ. प्रविणा कांबळी**
मानद सहाय्यक कार्यकारी संपादक

# साधुसंत आणि चमत्कार

- डॉ. दा. बा. भिंगारकर,
माहीम, मुंबई.

डॉ. दा. बा. भिंगारकर हे सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी आहेत. त्यांनी सेवानिवृत्तीनंतर वयाच्या ७३व्या वर्षी 'निरंतर शिक्षण' व वयाच्या ७६व्या वर्षी 'संत जनाबाई' या विषयावर दोन पीएच्. डी. पदव्या प्राप्त केलेल्या आहेत.

- कार्यकारी संपादक

चमत्कार म्हणजे काय? ज्या घटनेमागचा शास्त्रीय कार्यकारणभाव समजत नाही ती घटना म्हणजे चमत्कार.

भारतात मोठे मोठे ऋषी, योगी, साधु, संत आणि तपस्वी होऊन गेले. त्यांना सूक्ष्म व सर्वव्यापी अलौकिक योगसिद्धी व इतर अंतर्गत व अतर्क्य शक्ती प्राप्त झालेली दिसते. चांगदेव हे तेराव्या शतकात एक महान् योगी होऊन गेले. ज्ञानदेवांना भेटायला गेले ते वाघावर आरूढ होऊन व सर्पाचा चाबूक हातात घेऊन. आपल्या योगसिद्धीने ते मेलेली माणसे जिवंत करीत. चांगदेवांना सामोरे गेले ते ज्ञानदेव निर्जीव भिंतीला 'चल वये' म्हणून तिच्यावर स्वार होऊन. चांगदेवाना आणि ज्ञानदेवांना हे शक्य झाले ते त्यांच्या योगसाधनेने योग्यांना त्यांच्या योगसामर्थ्याने सिद्धी प्राप्त होते. सिद्धी म्हणजे दैवी सामर्थ्य; अद्‌भुत गोष्ट करण्याचे सामर्थ्य. अशा सिद्धी आठ प्रकारच्या आहेत. त्यांना अष्टसिद्धी म्हणतात. त्या पुढीलप्रमाणे होत १) अणिमा, २) महिमा ३) लघिमा, ४) प्राकाम्य, ५) प्राप्ती, ६) ईशिता, ७) वशिता, ८) कामवासायिता. या सिद्धी तप, सेवा, ध्यान इत्यादींचे फल होत. नामदेव ज्ञानदेव तीर्थयात्रेच्या वेळी तहान लागली म्हणून राजस्थानात एक खोल विहिरीच्या तळाशी पाणी होते, तेथे दोर पोहरा वगैरे पाणी काढण्याचे साधन जवळ नसल्यामुळे ज्ञानदेवांनी आपल्या योगसामर्थ्याने अंगुष्टरूप धारण करून विहिरीच्या तळाशी जाऊन आपली तहान भागविली.

योगाच्या प्रभावाने प्राप्त झालेल्या सामर्थ्याचा प्रभाव सर्व विश्वावर चालतो. योग किंवा तपश्चर्येच्या मार्गाने ती व्यक्ती आपल्या अंतर्गत सूक्ष्म दैवी व आध्यात्मिक शक्तीचा इतका विकास करू शकते की त्यामुळे ती भौतिक जगावर प्रभुत्व गाजविते. इतकेच नव्हे तर बसलेल्या ठिकाणाहून तिला त्रैलोक्यातील भूत, वर्तमान व

भविष्यकालीन घटना व गोष्टींचे ज्ञान दिव्यशक्तीमुळे होऊ शकते. अखिलसृष्टी, विश्वातील सर्व सचेतन व अचेतन वस्तुमात्र आणि सर्व भूतमात्र व प्राणिमात्र त्याला वश असल्याचा अनुभव येतो. त्यांच्या काही हालचालींचा व कृतींचा विचार करता आधुनिक शास्त्रीय नियम लुळे पडून त्यांची त्यांना संगती लागत नाही व त्यांचे स्पष्टीकरण करता येत नाही. सदर नियम खोटे ठरल्यासारखे वाटतात. अध्यात्म व मानसशास्त्र यात त्यांचा संचार असल्यामुळे त्यांच्या विषयीचे सर्व प्रश्न 'गूढवाद' या सदरात गणले जातात.

आजचे अशक्य वाटणारे प्रश्न उद्या सुटलेले आढळतात शंभर वर्षापूर्वी 'आकाशवाणी झाली' असे म्हणणे म्हणजे एक दैवी चमत्कार वाटे. पण आज घरोघरी हरघडी 'आकाशवाणी' होते आणि त्याचे कोणालाही आश्चर्य वाटत नाही. भारतीय युद्धात राजवाड्यात बसून संजय अंध धृतराष्ट्राला युद्धभूमीवर झालेल्या घटना प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणे व ऐकल्याप्रमाणे वर्णन करून सांगत असे. काही वर्षापूर्वी ही घटना अविश्वसनीय वाटे पण दूरदर्शनमुळे ही गोष्ट शक्त असली पाहिजे असे वाटू लागते. रामावतारी रामाने पुष्पक विमानात बसून लंकेहून अयोध्येपर्यंत प्रवास केला. ही एके काळी अविश्वसनीय वाटणारी गोष्ट आज तशी वाटत नाही तर ही गोष्ट अशक्य नव्हती असे आता वाटू लागते.

पांडुरंगाने भक्तास सहाय्य केल्याची कितीतरी उदाहरणे तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात दिली आहेत. पांडुरंग दगडी मूर्तीत चैतन्य प्रकट करून भक्तांची इच्छा पूर्ण करतो. विष्णुदास भक्तांना जात, धर्म, पंथ वगैरे बंधन नसते. ईश्वराला सर्व भक्त सारखेच प्रिय असतात. तेही आपापसात उच्च नीच हा भेद मानीत नाहीत. ते जगाचे कल्याण करतात व सर्व जग पवित्र करतात. भक्त आपल्या भक्तिभावाने विठ्ठलाच्या दगडी मूर्तीत चैतन्य प्रकट करून नैवेद्याचे दूध प्यावयास लावतात. पाणी आकारहीन असते पण त्याचे बर्फात रूपांतर झाले की ते साकार होते तसेच ईश्वर भक्ताकरिता सगुणरूप धारण करतो. योगी चित्तवृत्तीचे ब्रह्मतत्त्वावर केंद्रीकरण करतो म्हणजेच योग होय. त्यानंतर योगी ब्रह्माशी एकरूप होऊन ब्रह्मज्ञ होतो व त्याची सत्ता विश्वावर चालते. अहं ब्रह्मास्मि। आणि सर्वं खलु इदं ब्रह्म। याचा अर्थ मी ब्रह्म आहे आणि सर्वत्र ब्रह्म आहे. विश्वात सर्व तेच आहे. मग जड व चेतन हा भेद नाहीसा होतो. योग्याला, भक्ताला सर्वत्र ईशदर्शन होते. ब्रह्मानुभवाच्या शक्तीमुळे भौतिक शास्त्रज्ञांच्या कक्षेच्या पलीकडील अतींद्रिय व सूक्ष्म अशा आध्यात्मिक जगात व या जगात स्वसंकल्पाने व इच्छाशक्तीच्या जोरावर कोणताही चमत्कार करता येतो आम्हाला जरी तो चमत्कार वाटला तरी सूक्ष्म जगातील कार्यकारणभावाने तो घडतो.

येशू ख्रिस्ताने आपल्या दैवी शक्तीने अनेक रोगी रोगमुक्त केले, पिशाच्चबाधा नाहीशी केली. मृतास जिवंत केले व अनेक अतर्क्य गोष्टी केल्या कारण तो योगी होता.

अहंकाराचा वारा लागू न देता स्वतःच्या ठिकाणी नम्रता स्वीकारून परमात्मा शक्तीस शरण जाऊन परमात्माशक्तीचे यथार्थज्ञान झाले की भक्ताच्या ठिकाणी परमात्मतत्त्वाचा अंश प्रकट होतो व भक्त साक्षात ईश्वररूप होतो. अशा भक्ताला साहजिकच सृष्ट पदार्थावर शक्तीवर स्वामित्व मिळविता येते.

# मंत्रसिद्धी

तूंचि माझी माता। तूंचि माझा पिता।
हाचि साईनाथा। मंत्र माझा॥ (१)

तूंचि माझी भक्ति। तूंचि माझी मुक्ति।
तूंचि माझी शक्ति। मंत्र माझा॥ (२)


तूंचि माझी दृष्टि। तूंचि माझी सृष्टि।
तुजविण कष्टी। मंत्र माझा॥ (३)

तूंचि माझी आस। तूंचि माझा ध्यास।
तूंचि माझा श्वास। मंत्र माझा॥ (४)

तूंचि माझे दैव। तूंचि माझा देव।
तूंचि एकमेव। मंत्र माझा॥ (५)

हेचि सारे मंत्र। नित्य मी जपावे।
मुखें ते वदावे। साईराया॥ (६)

**- श्री. आर. पी. राव**
बंगलोर, कर्नाटक.



# वसंत ऋतुतील आहार-विहार

**- वैद्य किरण पां. भावे, आयुर्वेदाचार्य**

या अंकापासून आम्ही आयुर्वेदांतर्गत आरोग्यावरील नवीन लेखमाला सुरू करीत आहोत. आयुर्वेद हा आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे व त्यातील आरोग्य-संगोपन-संवर्धनाचे उपाय आता विश्वमान्य होत आहेत. वैद्य किरण पां. भावे, आयुर्वेदाचार्य ही लेखमाला आपल्या अनुभवसिद्ध लेखणींने सादर करणार आहेत. त्यांच्या घराण्याला आयुर्वेदाची परंपरा लाभलेली आहे. त्यांची ही सलग चौथी पिढी आयुर्वेदाची औषधे स्वत: शास्त्रोक्त रीतिने पारखून बनवत आलेली आहे. श्री साईलीलाच्या वाचकांना याचा लाभ होईल असा आम्हाला विश्वास वाटतो.

**- कार्यकारी संपादक**

आयु:कामयमानेन धर्मार्थसुखसाधनम्।
आयुर्वेदोपदेशेषु विधेय: परमादर:॥

धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ साधण्यासाठी दीर्घायुष्य आवश्यक आहे. त्यासाठी मनुष्याने वैद्यकशास्त्रात सांगितलेल्या गोष्टी समजून घेऊन त्याप्रमाणे वागावे व दीर्घायुष्य मिळवावे.

वायु: पितं कफश्चेति जयोदोषा: समासत:।
विकृता विकृता देह घ्नंती ते वर्तयंति च।

वायु, पित्त व कफ हे शरीरातील तीन मुख्य दोष आहेत. हे तीन दोष बिघडल्यामुळे रोगोत्पत्ति होते व योग्य प्रमाण व स्थितीमध्ये असतांना शरीर व्यापार सुस्थितीमध्ये चालवतात. माणूस निरोगी राहतो.

म्हणून आयुर्वेदाने मनुष्य निरोगी रहावा, शक्यतो रोग होण्याचे टाळावे, पर्यायाने समस्थितीमध्ये राहण्यासाठी दिनचर्या व ऋतुचर्या सांगितली आहे. ह्या मध्ये आपल्या रोजच्या आहाराबद्दल सांगितले आहे तसेच प्रत्येक ऋतुप्रमाणे आहार-विहारात बदल सुचविले आहेत. त्यातील ऋतुचर्येबद्दल संक्षेपाने पाहू.

पूर्ण वर्षामध्ये एकूण सहा ऋतु येतात. प्रत्येक ऋतु साधारणत: २ महिने असतो.

१. शिशिर-माघ, फाल्गुन २. वसंत-चैत्र, वैशाख ३. ग्रीष्म-जेष्ठ, आषाढ